# शेतकरी कर्जमाफीची तिसरी यादी जाहीर

## पात्र शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरणाचे काम केले तरच मिळणार पैसे

मुंबई (सरकार)पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची तिसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत राज्यातील ३ लाख ५१ हजार १९२ शेतकऱ्यांचा समावेश असून, या पात्र शेतकऱ्यांना कर्जमुक्तीचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

संबंधित शेतकऱ्यांनी आपल्या कर्जखात्याची थकबाकी तपासून नजीकच्या आपले सेवा केंद्रावर आधार प्रमाणीकरण करून घ्यावे, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ या योजनेंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या कालावधीत वितरित झालेली, ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली पीककर्जे तसेच पुनर्गठित व फेरपुनर्गठित कर्जांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येत आहे.

सहकार मंत्री बाबासाहेब पाटील म्हणाले, या योजनेची अंमलबजावणी ऑनलाइन संगणकीय प्रणालीद्वारे करण्यात येत असून, यासाठी महाआयटीची नियुक्ती करण्यात आली आहे. योजनेच्या पोर्टलवर बँकांनी एकूण ३१.१७ लाख थकीत कर्जखात्यांची माहिती अपलोड केली आहे. या माहितीच्या संगणकीय प्रक्रियेनंतर यापूर्वी २४ जुलै २०२६ रोजी १६.९६ लाख शेतकऱ्यांची पहिली यादी, ११ सप्टेंबर २०२६ रोजी ४.२० लाख शेतकऱ्यांची दुसरी यादी आणि १२ ऑक्टोबर २०२६ रोजी ३.५१ लाख शेतकऱ्यांची तिसरी यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे. अशा प्रकारे आतापर्यंत



एकूण २४.६७ लाख लाभार्थी शेतकऱ्यांच्या याद्या आधार प्रमाणीकरणासाठी प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत.

तिसऱ्या यादीतील विभागनिहाय आकडेवारी

छत्रपती संभाजीनगर विभागातील २ लाख ६ हजार ४५०.

अमरावती विभागातील ८५ हजार ७६.

नागपूर विभागातील ३० हजार ७३८.

नाशिक विभागातील १४ हजार २४४.

पुणे विभागातील ११ हजार ९२८.

कोकण विभागातील २ हजार ७५६ शेतकऱ्यांचा समावेश आहे.

लाभार्थी शेतकऱ्यांसाठी महत्वाच्या सूचना

तिसऱ्या यादीमधील पात्र लाभार्थी शेतकऱ्यांची जिल्हा निहाय यादी बँक शाखा, विकास संस्था व ग्रामपंचायतीमध्ये प्रसिद्ध करण्यात आली आहे.

यामध्ये समाविष्ट असलेल्या शेतकऱ्यांना संपूर्ण कर्जमुक्तीचा लाभ देण्यात येणार आहे.

कर्ज थकबाकीची खातरजमा करून आधार प्रमाणीकरण करावे

या यादीतील शेतकऱ्यांच्या कर्ज थकबाकीची रक्कम ३१ मार्च २०२६ रोजीच्या स्थितीनुसार नमूद करण्यात आली आहे. १ एप्रिल २०२६ पासूनचे पुढील व्याज व इतर खर्च माफ करण्यात येणार आहेत.

त्यामुळे शेतकऱ्यांनी ३१ मार्च २०२६ रोजीच्या कर्ज थकबाकीची खातरजमा करून जवळच्या आपले सेवा केंद्रावर जाऊन आधार प्रमाणीकरण पूर्ण करावे.

राष्ट्रीयीकृत व व्यापारी बँकांच्या यादीतील काही शेतकऱ्यांची ३१ मार्च २०२६ रोजीची कर्ज थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक असली, तरी शासनाच्या 'हेअर कट' धोरणानुसार संबंधित कर्जे पूर्णपणे निरंक करण्यात येणार आहेत.

योजनेअंतर्गत पात्र लाभार्थी शेतकऱ्यांमध्ये मयत झालेल्या तसेच वयस्कर व बोटांच्या ठशाची नोंद होत नसलेल्या लाभार्थ्यांना कर्जमुक्तीचा लाभ देण्याचे अनुषंगाने १९ ऑगस्ट २०२६ रोजी मानक कार्यप्रणाली (एसओपी) निर्गमीत करण्यात आलेली आहे.

आधार प्रमाणीकरण झाल्यानंतर कर्जमुक्तीची रक्कम त्यांच्या कर्ज खात्यावर जमा करण्यात येणार आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करून योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी केले.

beedsarkar

संपादक–आदोडे साहस

E-mail : beedsarkar @ Gmail.com

E-mail : beedsarkar @ Gmail.com किंमत: १ रू. पाने : ४

# बीडसरकार

बीड महाराष्ट्र वर्ष १३ वे अंक ३०१ मंगळवार १३ ऑक्टोबर २०२६ RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल दि.१४ ऑक्टोबर २०२६ पाने ४ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA Year 13 Issu 301 Tuesday 13 Octomber 2026 RNI NO. MAHMAR/2012/49908 पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027



## अमोल खुणेवर हल्ला करणाऱ्या तिघांना पकडले

### ग्रामीण पोलीसांची कामगिरी

बीड (सरकार) दिनांक ११ ऑक्टोबर २०२६ रोजी पोलीस ठाणे बीड ग्रामीण हद्दीतील पाली येथील नागनाथ मंदिर परिसरात अमोल सुखदेव खुणे, वय ३५ वर्षे, रा. रुई धानोरा, ता. गेवराई, जि. बीड व त्यांचे सोबती विजय गुरखुदे, गणेश खुणे व इतर यांच्यावर काही अज्ञात व्यक्तींनी लाकडी दांडके, दगड व लोखंडी पाइप यांसारख्या वस्तूंचा वापर करून जीवाने ठार मारण्याच्या उद्देशाने जबर मारहाण करून हल्ला केला होता.

सदर प्रकरणी फिर्यादी अमोल सुखदेव खुणे यांच्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बीड ग्रामीण येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ३८०/२०२६, कलम १०९ व इतर भारतीय न्याय संहिता (इछ्ड) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गंभीर घटनेची माहिती मिळताच अप्पर पोलीस अधीक्षक समीर शेख साहेब आणि बीड ग्रामीण पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन घटनेची शहानिशा केली व तपासाला सुरुवात केली. घटनास्थळी सीसीटीव्ही फुटेज उपलब्ध नसल्यामुळे हल्लेखोरांची ओळख पटविणे हे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. मात्र, बीड ग्रामीण पोलिसांनी गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तसेच उपलब्ध माहितीची पडताळणी करून हल्ल्यात सहभागी असलेल्या संशयितांची ओळख पटविण्यासाठी प्रयत्न केले. गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींची ओळख पटवून सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे व त्यांच्या पथकाने तपासात मिळालेल्या माहितीच्या आधारे मौजवाडी येथील काही संशयितांची ओळख पटवून त्यांना ताब्यात घेण्यात आले.

## आष्टीत डिजे चालकावर कारवाई

आष्टी (सरकार) श्री दुर्गा देवी / घटस्थापनेच्या अनुषंगाने पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत बंदोबस्त करत असतांना मौजे ब्रम्हगाव फाटा, वनवेवाडी व कानडी शिवारात डी. जे. वाजत असले बाबत माहिती मिळाल्याने डीजे बंद करून त्यावर कायदेशीर कारवाई करण्यात आली.

पोलीस ठाणे आष्टी हद्दी मध्ये घटनस्थापनेच्या अनुषंगाने पोलीस अधिक्षक साहेब, बीड यांचे आदेशाने पोलीस बंदोबस्त वाटप करण्यात आलेला होता. जिल्हयात डी. जे. ला बंदी असल्याने त्याबाबतच्या सुचना वेळोवेळी डी.जे.चालक व मालक यांना देण्यात आलेल्या असतांना देखील दि. ११/१०/२०२६ रोजी पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार हे पोलीस ठाणे हद्दीत बंदोबस्त करत असतांना मौजे ब्रम्हगाव फाटा, वनवेवाडी व कानडी शिवारात डी. जे. वाजत असले बाबत माहिती मिळाल्याने आम्ही डी. वाय. एस. पी. पांढरे, सपोनि वाघमोड, पोउपनि अवारे व पोकों / शेख, पोकों/ पाखरे, पोह/ नवले व पोकों / लोंढे असे पेट्रोलिंग करत असतांना सदर ठिकाणी जावुन डी. जे. वाद्य बंद करुन सदरची डी. जे. हे पुढील योग्य त्या कायदेशिर कारवाई करणे कामी पोलीस स्टेशन येथे घेवुन आलोत. व सदरील डी. जे. चालक व मालक यांचेवर योग्य ती कारवाई करत आहोत. तसेच देवी विसर्जन मिरवणुकीदरम्यान नागरिकांनी शांतता व सुव्यवस्था राखून प्रशासनास सहकार्य करावे, तसेच पोलीस प्रशासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन पोलीस ठाणे आष्टी यांचेमार्फत करण्यात येत आहे.

## विहिरीच्या काठावर दुचाकी उभी अन् पाण्यात २५ वर्षीय तरुणाचा मृतदेह!

आष्टी (सरकार): तालुक्यातील अंभोरा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील पिंपळगाव घाट येथे सोमवारी सकाळी एक धक्कादायक आणि संशयास्पद घटना उघडकीस आली आहे. विहिरीच्या काठावर दुचाकी उभी करून विहिरीच्या पाण्यात एका अंदाजे २५ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आला आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात मोठी खळबळ उडाली असून, तरुणाचा मृत्यू घातपातातून झाला की त्याने आत्महत्या केली, याबाबत विविध तर्कवितर्क लढवले जात आहेत. अंभोरा पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन मयताची ओळख पटवण्याचे काम युद्धपातळीवर हाती घेतले आहे.

पिंपळगाव घाट शिवारातील एका शेतातील विहिरीच्या बाजूला एम.एच. १६ ए.डब्ल्यू. ७४१४ या क्रमांकाची दुचाकी बऱ्याच वेळेपासून संशयास्पद



स्थितीत उभी असल्याचे स्थानिक शेतकऱ्याच्या निदर्शनास आले. त्यांनी जवळ जाऊन विहिरीत डोकावून पाहिले असता, पाण्यात एका तरुणाचा मृतदेह तरंगताना दिसला. शेतकऱ्याने तात्काळ या घटनेची माहिती गावातील इतर लोकांना दिली आणि अंभोरा पोलीस ठाण्याशी संपर्क साधला. घटनेची माहिती मिळताच अंभोरा पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक विक्रांत हिंगे यांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलीस हवालदार भरत माने आणि अमोल शिरसाठ यांना तात्काळ घटनास्थळी रवाना केले. पोलिसांनी स्थानिक गावकऱ्यांच्या सहकार्याने दोरीच्या साहाय्याने विहिरीतून तरुणाचा मृतदेह सुरक्षितपणे बाहेर काढला. घटनास्थळाचा पंचनामा केल्यानंतर मृतदेह शवविच्छेदनासाठी सुलेमान देवळा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात हलवण्यात आला.

## दुष्काळी तालुक्यातील विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करा

### उच्च शिक्षण मंत्र्यांचे विद्यापीठाला निर्देश

मुंबई (सरकार): पावसाने ओढ दिल्यामुळेराज्यातील ३४ जिल्ह्यांमधील २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर या तालुक्यातील विद्यार्थ्यांना दिलासा देण्यासाठी त्यांच्या परीक्षा शुल्क माफीबाबत उच्च शिक्षण संचालनालयाने परिपत्रक जारी केले आहे. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता विद्यार्थ्यांना आर्थिक दिलासा देण्यासाठी त्यांच्याकडून परीक्षा शुल्क आकारण्यात येऊ नये, असे



स्पष्ट निर्देश उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क घेऊ नये, अशी भूमिका स्पष्ट केली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क वसूल करणाऱ्या महाविद्यालयांवर कारवाई करण्यात येईल. मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकरी आणि सर्वसामान्य कुटुंबांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांवर परीक्षा शुल्काचा अतिरिक्त आर्थिक भार पडू नये, यासाठी शासनाच्या निर्देशांची काटेकोर अंमलबजावणी करावी, असे पाटील म्हणाले.




## केंद्र सरकारनं युपीआय व्यवहारावरील शुल्काबाबतचा निर्णय फिरवला

नवी दिल्ली (वृत्तसंस्था): युपीआय व्यवहारांसंदर्भात केंद्र सरकारने पुन्हा एकदा मोठा निर्णय घेतला आहे. यापूर्वी केंद्र सरकारने युपीआय च्या माध्यमातून होणाऱ्या व्यापारी व्यवहारांवर शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला होता. व्यापारी वर्गात या निर्णयाचे तीव्र पडसाद उमटले होते. त्यामुळे आता केंद्र सरकारने णझख व्यवहारांवरील चूठ शुल्काबाबचा हा निर्णय फिरवला आहे. त्यामुळे आता निवडक व्यापारी युपीआय व्यवहारांवरच MDR शुल्क लागू होईल. तसेच यापूर्वीच्या निर्णयाची अंमलबजावणी येत्या दोन दिवसांत म्हणजे १५ ऑक्टोबपासून होणार होती. मात्र, नव्या घोषणेनुसार केंद्र सरकारने यूपीआय व्यवहारांवर शुल्क आकारणी ही दिवाळीनंतर लागू होईल, असे सांगितले आहे. दिवाळीच्या तोंडावर हा व्यापारी आणि ग्राहक या दोहोंसाठी मोठा दिलासा मानला जात आहे.

मात्र,दिवाळीनंतर युपीआय व्यवहारांवर MDR शुल्क हे तात्काळ लागू होईल, असे NPCI -UPI अँड सर्व्हिसेस स्टीअरिंग कमिटीकडून जाहीर करण्यात आले आहे. शुल्क लागू करण्याची निश्चित तारीख स्वतंत्रपणे जाहीर होईल. सणासुदीचा काळ लक्षात घेऊन निर्णयाची अंमलबजावणी पुढे ढकलण्यात आली. दिवाळीनंतरही सरसकट सर्व णझख व्यवहारांवर नाही, तर निवडक व्यापारी व्यवहारांवरच शुल्क लागू होणार असल्याचे UPI अँड सर्व्हिसेस स्टीअरिंग कमिटीकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

## विनापरवाना मुरूम वाहतूक करणारा हायवावर कारवाई;२० लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त



बीड (सरकार): बीड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत विनापरवाना आणि विनारॉयल्टी मुरूम वाहतूक करणाऱ्या हायवा टिप्परवर पोलिसांनी कारवाई केली. या कारवाईत मुरूमसह भारत बेंझ कंपनीचा टिप्पर असा एकूण २० लाख १५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई सोमवारी, १२ ऑक्टोबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास पालवण शिवारातील नवीन रेल्वे पूल, चऱ्हाटा रोड येथे करण्यात आली.

बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाला गोपनीय बातमीदारामार्फत संबंधित ठिकाणी अवैध मुरूम वाहतूक होत असल्याची खात्रीलायक माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी घटनास्थळी जाऊन तपासणी केली असता, भारत बेंझ कंपनीचा ओडी १५ ई २४१५ क्रमांकाचा हायवा टिप्पर आढळून आला. या टिप्परमध्ये अंदाजे पाच ब्रास मुरूम भरलेला होता.

टिप्पर चालक गोविंद हरिचंद्र मस्के (वय ३२) आणि भागवत पंडित मस्के (वय ३३), दोघेही रा.पालवण, ता. जि. बीड, हे शासनाचा आवश्यक परवाना नसताना आणि रॉयल्टी न भरता मुरूम वाहतूक करत असल्याचे पोलिसांच्या निदर्शनास आले. त्यानंतर पोलिसांनी टिप्परसह मुरूम जप्त करून पंचनामा केला.या प्रकरणी पोलीस हवालदार मनोज अशोकराव जोगदंड यांच्या फिर्यादीवरून बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ३८३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३०३(२) व ३(५) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार संतोष जायभाये करीत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक समीर शेख आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजीव नवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाळराजे दराडे, देविदास सोनवळे, संतोष जायभाये, मनोज जोगदंड, फेरोज पठाण, संतोष कोटुळे व इतर कर्मचाऱ्यांनी केली. बीड ग्रामीण पोलिसांकडून मागील काही महिन्यांपासून अवैध वाळू आणि मुरूम वाहतुकीविरुद्ध कारवाई केली जात आहे. यापुढेही पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे आणि विनापरवाना गौण खनिज वाहतुकीविरुद्ध कारवाई सुरू ठेवण्यात येणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.

gSmXHS$sII

# एकजुटीचे बळ

महाराष्ट्र लोकसेवा आयोग अर्थात एमपीएससी पेपरफुटीसह आयोगाच्या अध्यक्षांच्या राजीनाम्यासाठी विद्यार्थ्यांनी सुरू केलेल्या आंदोलनाला तूर्तास विराम मिळाला आहे. पेपरफुटीच्या तपासासाठी नेमण्यात आलेला चौकशी आयोग, त्यावरील तुकाराम मुंढे यांची नियुक्ती आणि एमपीएससी आयोगाचे अध्यक्ष विवेक भिमनवार यांची रजेवर जाण्याची घोषणा या पार्श्वभूमीवर हे आंदोलन स्थगित करण्यात आले आहे. विद्यार्थी एकजुटीचेच हे बळ म्हणावे लागेल.

पेपरफुटी, परीक्षांमधील गोंधळ, गैरप्रकार व परीक्षा पुढे ढकलण्याच्या प्रकारांमुळे सध्या राज्यासह देशभरातील विद्यार्थीमन अस्वस्थ आहे. नीट पेपरफुटीप्रकरणात राजधानी दिल्लीतील जंतर-मंतरवर विद्यार्थ्यांच्या असंतोषाचा झालेला स्फोट व त्यातून शिक्षणमंत्र्यांना द्यावा लागलेला राजीनामा, हे उदाहरण ताजेच. मागच्या काही दिवसांपासून एमपीएससी परीक्षांमध्येही असाच गोंधळ सुरू असल्याचे सातत्याने पहायला मिळाले. कधी पेपर फुटले, गडबड झाली, तर कधी पेपर पुढे ढकलल्याने विद्यार्थ्यांना मनस्ताप सोसावा लागला. त्यातूनच पुण्यात एमपीएससी विद्यार्थ्यांचे अलीकडच्या काळातील सर्वांत मोठे आंदोलन उभे राहिले. रोहित पवार यांच्या नेतृत्वाखालील या आंदोलनात सांगली, सातारा कोल्हापूरपासून राज्यभरातील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झालेले दिसले. खरेतर एमीपीएससीची तयारी करणाऱ्यांमध्ये ग्रामीण भागातील विद्यार्थी लक्षणीय प्रमाणात असतात. हाडाची काडे करून पालक विद्यार्थ्यांना पुण्यासारख्या शहरामध्ये पाठवतात. मेस, अभ्यासिकेचा खर्च उचलतात. मर्यादित जागा असल्या, तरी विद्यार्थीही सर्वस्व पणाला लावून अभ्यास करतात. कारण मनात केवळ अधिकारी व्हायचे लक्ष्य असते. परंतु, मागील काही वर्षांमध्ये पेपरफुटी वा तत्सम गैरप्रकारांमुळे कित्येक विद्यार्थ्यांचा भ्रमनिरास झाला. त्यातून काही विद्यार्थी नैराश्याचे बळी ठरले. या पार्श्वभूमीवर आयोगाच्या कारभाराविरोधात विद्यार्थ्यांनी उपसलेले आंदोलनाचे हत्यार स्वाभाविकच म्हणावे लागेल. मागील जवळपास दहा दिवसांपासून एस. एम. जोशी पूल परिसरात सुरू असलेल्या या आंदोलनाच्या माध्यमातून पेपरफुटीच्या तपासासह आयोगाचे अध्यक्ष भीमनवार यांनी राजीनामा दिला पाहिजे, अशी मागणी लावून धरण्यात आली होती. अनेक नेते, सामाजिक कार्यकर्त्यांनीही आंदोलनस्थळी भेट देत या मागण्यांना जाहीर पाठिंबा दिला. त्यामुळे आंदोलनाचे बळ वाढत गेले. खरेतर विद्यार्थी हा या आंदोलनाचा केंद्रबिंदू. गांधीजयंतीपासून सत्याग्रहाचे हत्यार उपसणाऱ्या एमपीएससीच्या विद्यार्थ्यांनी कुठेही आपला निर्धार ढळू दिला नाही. मुळात कोणत्याही आंदोलनाच्या यशस्वितेकरिता त्याची वैचारिक बैठक पक्की असावी लागते. या आंदोलनाची वैचारिक बैठक कशी आणि काय आहे, हे विवेकानंद पाटील यांच्यासारख्या विद्यार्थी मित्रांनी दाखवून दिले. वास्तविक, देशाला अनेक हिरे अशा प्रकारच्या आंदोलनातूनच मिळाले आहेत. म्हणूनच विवेकी विवेकानंद पाटील यांच्याकडूनही बऱ्याच अपेक्षा असतील. एखादे आंदोलन सुरू करणे सोपे असते. परंतु, ते चालवणे आणि योग्य वेळी थांबवणे, यात नेतृत्वाचा कस असतो. रोहित पवार यांनी यामध्ये दाखवलेल्या तारतम्याने त्यांचे नेतृत्व खऱ्या अर्थाने उजळलेले दिसते. याचा आगामी राजकीय वाटचालीकरिता निश्चित त्यांना लाभ होऊ शकेल. त्याचबरोबर विद्यार्थी नेता म्हणून तयार झालेली नवी इमेजही त्यांचा प्रवास अधिक प्रशस्त करणारी ठरू शकते. पेपरफुटीच्या तपासासाठी चौकशी आयोग नेमतानाच अध्यक्षपदी माजी न्यायमूर्ती दिलीप भोसले आणि सचिवपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांना चौकशी पूर्ण होईपर्यंत रजेवर पाठविण्यात आले आहे. हे दोन महत्त्वाचे निर्णय घेतानाच विद्यार्थ्यांसोबतच्या चर्चेकरिता सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले यांना पाठविण्याची रणनीतीही महत्त्वाची. आंदोलन नाजूकपणे कसे हाताळायचे, याचा हा वस्तुपाठच. त्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या राजकीय कौशल्याचेही कौतुक केले पाहिजे. याबाबत देवाभाऊंकडून सध्याच्या शीर्षस्थ नेतृत्वानेही धडे घ्यायला हरकत नाही.

# कोजागिरी पौर्णिमेला औषधाचा लाभ घ्यावा - प्रभाकर महाराज गुरव

## कै.भानुदास महाराज (पुजारी)गुरव यांची परंपरा कायम!

बीड (प्रतिनिधी):- येथील कंकालेश्वर मंदिर येथे सालाबाद प्रमाणे याही वर्षी कोजागीरी पौर्णिमेला दमा, श्वास, कफ, खोकला, सर्दी, ॲलर्जी व जुनाट दमा आदी रोगांवर रामबाण व प्रभावी औषध रविवार दि.२५ ऑक्टोबर २०२६, रात्री १२ वाजता औषध घेणे व औषध घरी पोहच घेवून जाणे. जर कोणास काही आजार असल्यास वरील दिवशी उपस्थित राहून औषध घ्यावे असे आवाहन मंदिराचे पुजारी प्रभाकर भानुदास महाराज गुरव यांनी केले आहे.



कै.भानुदास महाराज गुरव



कै.भास्कर महाराज गुरव



प्रभाकर महाराज गुरव

दरवर्षी कोजागीरी पौर्णिमेला गुरव परिवाराच्यावतीने गेल्या चाळीस वर्षापासून कै. भास्कर महाराज यांचे वडील, कै.भानुदास महाराज गुरव हे विविध रोगांवर कायमस्वरुपी रामबाण औषध देत असत. तीच परंपरा कायम ठेवत गुरव बंधूनी चालू ठेवली आहे. आज पर्यंत हजारो रुग्ण कै.भास्कर महाराज गुरव यांच्या औषधीने कायमस्वरुपी बरे झाले आहेत. आता दरवर्षी हजारो लोक या ठिकाणी कोजागीरी पौर्णिमेला येवून औषध घेतात आणि आपल्या रोगातून मुक्त होतात. हे औषध जटीबुटी असून दुधात मिश्रीत करुन याच दिवशी रात्री दिली जाते. महाराष्ट्रातील

कै. कल्याण महाराज गुरव




प्रत्येक जिल्ह्यातून हजारो लोक कंकालेश्वर मंदिरात येवून कोजागीरी पौर्णिमेला आपल्याला जडलेल्या रोगाचा उपचार करुन बरे होतात. तरी दुध अर्धा ग्लास गरम करून थंड झाल्यावर त्यामध्ये औषध मिश्रण करून पिणे. तसेच औषध घेतल्यानंतर तीन वर्षे पपई खाऊ नये, मांसाहारामध्ये मासे खाऊ नये, कवळे दुध घेवू नये, औषध तीन वर्षे कोजागिरी पौर्णिमेला घ्यावे. रुग्णांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन श्री कंकालेश्वर मंदिर गुरव परिवाराच्यावतीने प्रभाकर महाराज गुरव, श्रीराम महाराज गुरव, संजय कल्याणराव गुरव, चंद्रकांत कल्याणराव गुरव, प्रसाद भास्करराव गुरव, अमर श्रीराम गुरव, गणेश श्रीराम गुरव, अजय प्रभाकर गुरव, विजय प्रभाकर गुरव, सुरज संजय गुरव,संभाजी महाराज गुरव व समस्त गुरव परिवाराच्यावतीने केले आहे.

# मुलांमधील अशक्तपणा दूर करण्यासाठी आहारात करा बदल

मुलांमध्ये दिवसभर खेळण्याची आणि उडी मारण्याची क्षमता असते. अशा स्थितीत, जर तुमचे मूल खेळण्यात रस न घेता शांत बसले आणि खेळायला गेले तरी त्याला पटकन थकवा जाणवू लागतो आणि उदास राहते, तर असे होऊ शकते की मूल शारीरिकदृष्ट्या निरोगी नाही. अशक्तपणामुळे मुलंही असं वागतात.स्नायूंच्या कमकुवतपणामुळे मुलांना फक्त खेळण्यातच नाही तर चालण्यातही त्रास होऊ शकतो.




अनेक वेळा मुलांमध्ये अशक्तपणा इतका वाढतो की त्यांना वैयक्तिक कामही करता येत नाही. मुलांमधील अशक्तपणा या लक्षणांमुळे जाणून घ्या.

**मुलामध्ये अशक्तपणाची लक्षणे, डोकेदुखी आणि थकवा येणे** -जर मूल वारंवार डोकेदुखीबद्दल बोलत असेल किंवा थोड्या हालचालींनंतरच थकल्यासारखे वाटू लागते, तर ते आंतरिक अस्वस्थतेचे लक्षण मानले जाते. अनेक वेळा खेळताना किंवा काही काम करताना मुलाच्या हृदयाची गती वाढते आणि त्याला श्वास घेण्यास त्रास होऊ लागतो. **पाय दुखणे आणि चालायला त्रास होणे-** अनेक वेळा पोषणाअभावी मुलांच्या पायात अशक्तपणा येतो. धावण्याच्या आणि उडी मारण्याच्या वयात, मुले अजूनही नीट चालू शकत नाहीत आणि अनेकदा त्यांच्या पायांमध्ये वेदना होत असल्याची तक्रार करतात. मुलांना उभे राहणे, धावणे आणि उडी मारणे कठीण जाते. हे कॅल्शियमच्या कमतरतेचे लक्षण देखील असू शकते. **वारंवार ताप येणे-** मुलाला वारंवार ताप येत असेल तर त्याची प्रतिकारशक्ती कमकुवत होण्यासोबतच तो शारीरिकदृष्ट्याही कमकुवत होऊ शकतो. **हात दुखणे-** कधीकधी मुले हात आणि बाहू दुखण्याची तक्रार करतात. लिहिताना, स्वतः जेवताना, खेळताना, बॅग घेताना किंवा शर्टचे बटण लावताना अस्वस्थ होतात. **चेहऱ्याचा कोरडेपणा :** ही मुलामध्ये एक कमजोरी आहे. हे सर्व प्रथम मुलाच्या चेहऱ्यावरील कोरडेपणा, फाटलेले ओठ आणि डोळ्यांखाली काळी वर्तुळे यावरून ओळखले जाऊ शकते. मुलांच्या चेहऱ्यावरही पुरळ दिसू शकतात. त्यांना बोलण्यात, गिळण्यात आणि चघळण्यात ही त्रास होतो. **मुलांमध्ये अशक्तपणाची कारणे जाणून घ्या :** लहान मुलामध्ये अशक्तपणाची अनेक कारणे असू शकतात. पौष्टिकतेची कमतरता, स्नायू कमकुवत होणे, पोलिओ, तीव्र फ्लॅक्सिड मायलाइटिस आणि इतर अनेक रोगांमुळे मुलामध्ये अशक्तपणा येऊ शकतो. अशक्तपणामुळे मुलाला काम करताना त्रास तर होतोच शिवाय मुलाचा विकासही मंदावतो. त्यांची उंची वाढत नाही आणि अनेक कमकुवत मुले कमी वजनाची राहतात. अशा परिस्थितीत ताबडतोब डॉक्टरांशी संपर्क साधून मुलाच्या सर्व आवश्यक चाचण्या कराव्यात. **अशक्तपणा टाळण्याचे मार्ग :** ✻ मुलांमध्ये अशक्तपणाची लक्षणे दिसल्यास त्यांना प्रथम डॉक्टरांकडे घेऊन जा. ✻ मुलांना पौष्टिक आहार द्या, ज्यामध्ये प्रथिने, लोह, कॅल्शियम, जीवनसत्त्वे आणि अँटिऑक्सिडंट्स भरपूर असतात.✻ मुलाला हायड्रेटेड ठेवण्याचा प्रयत्न करा. ✻ मुलाने काही शारिरीक समस्या सांगितल्यास त्याकडे दुर्लक्ष करू नका.

## वजन कमी करायचे आहे? आहारात या पदार्थांचा नक्की समावेश करा

आजकालची व्यस्त दिनचर्या आणि दिवसभर ऑफिसमध्ये बसून काम करणे. दुपारी जड जेवण करणे आणि त्यानंतर थोडा वेळ न फिरता खुर्चीवर बसून राहणे. या सर्वांमुळे लठ्ठपणा येतो आणि आपले वजनही झपाट्याने वाढू लागते. कधीकधी असे घडते की आपले वजन इतक्या वेगाने वाढू लागते की इच्छा असूनही आपण काहीही करू शकत नाही. हे टाळण्यासाठी लोक जेवण करणे सोडून देतात, ज्यामुळे त्यांचे वजन कमी होण्याऐवजी ते अधिक अशक्त होतात आणि त्यांना पूर्वीपेक्षा जास्त अडचणींना सामोरे जावे लागते, तसेच अनेक प्रकारच्या आजारांना तोंड द्यावे लागते.

मध आणि लिंबू प्रभावी आहेत: सकाळी उठल्याबरोबर कोमट पाण्यात लिंबू आणि मध मिसळून ते प्या. याचे नियमित सेवन करा. वजन कमी करण्यासाठी लिंबू खूप प्रभावी आहे. जर तुम्ही हे पाणी रोज प्याल, तर तुम्हाला ३० दिवसांच्या आत परिणाम दिसतील.

तुमच्या नाश्त्यामध्ये आरोग्यदायी पदार्थांचा समावेश करा: जर तुमचे वजन झपाट्याने वाढत असेल, तर नाश्त्यामध्ये रोटी किंवा पराठ्याऐवजी फळांचा समावेश करण्याचा विचार करा. यामुळे तुम्हाला पुरेशा कॅलरीज मिळतील. तुमच्या नाश्त्यामध्ये एक सफरचंद किंवा दोन केळींचा समावेश करा, परंतु यापेक्षा जास्त सेवन करणे टाळा. दुपारच्या जेवणात काय घ्यावे: दुपारच्या जेवणात २-३ पोळ्या, १ वाटी डाळ, १ वाटी दही आणि १ वाटी हिरव्या भाज्या घ्या. तुम्हाला भात आवडत असल्यास, फक्त १-२ पोळ्या घ्या. तुमच्या जेवणात सॅलडचा नक्की समावेश करा. लोणचे किंवा पापड खाणे टाळा.

**रात्रीच्या जेवणात हलके अन्न खा:** रात्रीच्या जेवणात अगदी हलके अन्न घ्या. १ वाटी डाळ, १ वाटी भाजी आणि २ पोळ्या खा. तुम्ही तुमच्या जेवणात पौष्टिक सॅलड किंवा पौष्टिक सूपचा समावेश करू शकता. तपकिरी तांदळाचा वापर करा: सामान्यतः आपण पांढरा भात खातो, ज्यात साखरेचे प्रमाण जास्त असल्यामुळे आपले वजन वाढते. त्यामुळे, आपल्या जेवणात तपकिरी तांदळाचा वापर करण्याचा विचार करा. त्यात साखरेचे प्रमाण कमी असते आणि ते आपले वजन नियंत्रणात ठेवण्यास मदत करते.



# निरोगी शरीरासाठी भारतीय जेवणाचे ताट कसे असावे? जाणून घ्या 'हेल्दी ताटाचा' खरा

निरोगी आणि संतुलित आरोग्यासाठी भारतीय जेवणाचे ताट कसे असावे, याचा सोपा आणि शास्त्रीय नियम म्हणजेच 'हाफ प्लेट नियम' होय. आपल्या पारंपरिक भारतीय जेवणात सर्व पोषक घटक असतात, फक्त ताटातील पदार्थांचे प्रमाण योग्य असणे गरजेचे असते.

**१. भारतीय 'हेल्दी ताटाची' योग्य रचना :** ताटाचे मुख्य ४ भाग करून पदार्थांचे वाटप खालीलप्रमाणे करावे: ५०% भाग (अर्धे ताट) - भाज्या आणि कोशिंबीर: यात हिरव्या पालेभाज्या, वाफवलेल्या/मोड आलेल्या भाज्या, गाजर, काकडी, टोमॅटो आणि बीट यांसारख्या कोशिंबिरीचा समावेश असावा. फायदा: यातून शरीराला भरपूर फायबर, व्हिटॅमिन्स आणि मिनरल्स मिळतात, ज्यामुळे पचनक्रिया उत्तम राहते.

२५% भाग (पाव ताट) - प्रथिने: यात वरण/आमटी, मूग-मटकी-चवळीची उसळ, पनीर, दही किंवा ताक यांचा समावेश असावा. (मांसाहारी असल्यास उकडलेले अंडे किंवा मासे/चिकन).



**फायदा:** प्रथिनांमुळे स्नायू मजबूत होतात आणि दीर्घकाळ भूक लागत नाही. **२५% भाग (पाव ताट) - कर्बोदके:** यात ज्वारी, बाजरी, नाचणी (रागी) किंवा गव्हाची १-२ पोळी/भाकरी किंवा हस्तप्रमाणात (१ लहान वाटी) भात असावा. **फायदा:** यातून शरीराला दिवसभरासाठी आवश्यक ऊर्जा मिळते. **२. ताटातील इतर ४ महत्त्वाचे घटकगुड फॅट्स :** वरण-भातावर किंवा भाकरीवर १ लहान चमचा साजूक तूप आवर्जून घ्यावे. हे जीवनसत्त्वे शोषून घेण्यास मदत करते. **प्रोबायोटिक्स:** जेवणात १ वाटी ताक किंवा दही असावे. यामुळे आतड्यांचे आरोग्य सुधारते. नैसर्गिक चव व पाचक घटक: लिंबाची एक फोड, थोडेसे आले-लसणाची चटणी किंवा घरातील पारंपरिक आवळ्याचे/लिंबाचे लोणचे. **पाणी:** जेवताना खूप जास्त पाणी पिणे टाळावे. जेवणापूर्वी ३० मिनिटे किंवा जेवणानंतर ४५ मिनिटांनी पाणी प्यावे. **३. निरोगी ताटासाठी 'हे' ५ नियम नेहमी लक्षात ठेवा : रंगीबेरंगी ताट :** ताटात जितके जास्त नैसर्गिक रंग (हिरवा, लाल, पिवळा, पांढरा) असतील, तितके जास्त अँटीऑक्सिडंट्स शरीराला मिळतात. प्रोसेस्ड अन्न वर्ज्य: ताटात पापड, कुरडई, जास्त तेलकट किंवा मैद्याचे पदार्थ रोजच्या जेवणात ठेवू नका. ३२ वेळा चावून खाणे: अन्न सावकाश आणि व्यवस्थित चावून खाल्यास पचन व्यवस्थित होते आणि वजन नियंत्रणात राहते. रात्रीचे जेवण हलके: रात्रीच्या ताटात भात किंवा जड धान्यांचे प्रमाण कमी ठेवून भाज्या व सूपाचा वापर जास्त करावा.

# सकाळी रिकाम्या पोटी जास्वंदीचे फूल खाल्ल्यास शरीरावर काय परिणाम होतो?

जास्वंदीच्या फुलांना जवाकुसुम असेही म्हणतात. इंग्रजीमध्ये त्यांना हिबिस्कस म्हणतात. युनानी औषधशास्त्रात जास्वंदीचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. कोलेस्ट्रॉल, मधुमेह, रक्तदाब, मूत्रपिंडाचे आजार आणि घशाचे संक्रमण यांसारख्या आजारांवर उपचार करण्यासाठी याचा उपयोग होतो. हे व्हिटॅमिन सी, कॅल्शियम, फॅट, फायबर, नायट्रोजन, फॉस्फरस, टार्टारिक आणि ऑक्झॅलिक सिड, फ्लेव्होनॉइड्स आणि फ्लेव्होनॉइड ग्लायकोसाइड्सचा एक चांगला स्रोत आहे. जास्वंदीच्या फुलांचे अनेक उपयोग आहेत. चला, रिकाम्या पोटी ते खाण्याचे फायदे जाणून घेऊया.




**जास्वंदीचे फूल खाण्याचे फायदे:** सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन केल्याने वजन कमी होण्यास मदत होते. या फुलामध्ये जीवाणूनाशक गुणधर्म आहेत जे शरीरातील जीवाणूंना नष्ट करू शकतात. यकृत निरोगी ठेवण्यासाठी याचे सेवन केले जाते.

रिकाम्या पोटी खाल्ल्याने किंवा चहाबरोबर घेतल्याने शरीरातील विषारी द्रव्ये बाहेर टाकण्यास मदत होते. यात लोह असते. याचे सेवन केल्याने रक्तस्राव कमी होण्यास मदत होते आणि निमियासाठी ते फायदेशीर ठरते. योग्य प्रकारे सेवन केल्यास, त्याचे वृद्धत्वविरोधी गुणधर्म आहेत आणि ते तुमची त्वचा तरुण दिसण्यास मदत करते. याची फुले उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी फायदेशीर असल्याचे दिसून आले आहे, ज्यामुळे रक्तदाब नियंत्रणात ठेवण्यास मदत होते. जास्वंदीची फुले सर्दी आणि ताप टाळण्यासाठी खूप उपयुक्त मानली जातात. जास्वंदीची फुले व्हिटॅमिन सीचा चांगला स्रोत आहेत आणि खोकला, घसादुखी, सर्दी आणि छातीतील कफ कमी करण्यास मदत करू शकतात. **टीप :**आरोग्यविषयक सल्ले केवळ माहितीसाठी आहेत, ते फक्त डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच वापरून पहा.

## थोडक्यात

### गेवराईरात जिवाजी महाले यांची जयंती साजरी



**गेवराई (प्रतिनिधी)** महाराष्ट्र नाभिक महामंडळ शाखा गेवराई च्या वतीने शूरवीर जिवाजी महाले यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. गेवराई येथील राष्ट्रीय संत शिवमणी सेनाजी महाराज मंदिर येथे शिवभक्त शूर वीर शिवाजी महाले यांची जयंती साजरी करण्यात आली प्रथम महाराष्ट्र नाभिक महामंडळाचे तालुकाध्यक्ष नानासाहेब पंडित यांच्या हस्ते वीर जिवाजी महाले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले व २१ तोफाचे सलामी देऊन शूरवीर जिवाजी महाले यांचा विजय असो अशा घोषणा देण्यात आल्या यावेळी नाभिक समाजाचे जेष्ठ मार्गदर्शक कॅप्टन शंकरराव सूर्यवंशी सर संत शिरोमणी सेनाजी महाराज मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष पत्रकार सुनील पोपळे महाराष्ट्र नाभिक कर्मचारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष उत्तमराव सोनवणे महाराष्ट्र एकता नाभिक कर्मचारी महासंघाचे प्रदेशाध्यक्ष ज्ञानेश्वर चातुर ह .भ .प राजेंद्र महाराज पंडित नाभिक महामंडळाचे शहराध्यक्ष नागेश पंडित ज्येष्ठ नाभिक कार्यकर्ते आर आर राऊत बाबुराव पवळे हरिभाऊ पंडित ओमकार ठेकेदार गणेश पंडित संतोष काशीद आणि सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते

### पाहणीचा खर्चच कर्जमाफीएवढा! खासदार आमदाराच्या दौऱ्याने शेतकरी जगणार का–शेख युनूस

**बीड (प्रतिनिधी):** महाराष्ट्र सरकारने सरसकट जाहीर दुष्काळ केलेला आहे मग केंद्रीय पथकासोबत लोकप्रतिनिधीचा लवाजमा, शेतकऱ्याचा संताप एवढ्यात खर्चात कर्जमाफी झाली असती!



बीड जिल्ह्यातील १३६ महसूल मंडळे सरसकट दुष्काळग्रस्त म्हणून जाहीर झालेले आहे. सरकारने जाहीर केलेल्या या दुष्काळानंतर आता मतदारसंघातील खासदार आमदार केंद्रीय पथकासोबत लवाजमासह सोबत होते. सुकलेली सोयाबीन, जळालेला कापूस, करपलेली बाजरी... शेतात उभे राहून पाहणी करण्यात आली. अधिकारी फोटो काढत होते, लोकप्रतिनिधी आश्वासन देत होते. पण शेतात उभा असलेला बळीराजा मात्र एकच सवाल करत होता. एका दिवसाच्या पाणी दौऱ्यावर शासनाचा लाखो रुपयांचा खर्च होतो. हेलिकॉप्टर, गाड्यांचा ताफा , अधिकारी जेवणावळ... एवढ्या खर्चात आमच्यासारख्या १०० शेतकऱ्यांचे कर्ज माफ झालं असतं. खासदार साहेब आणि आमदार साहेब दौऱ्याने आम्ही जगणार का? आम्हाला फोटो नको, आम्हाला कर्जमाफी आणि तात्काळ मदत हवी! असा घणाघात शेतकऱ्यांनी केला आहे. स्वतंत्र पत्रकार शेख युनूस यावर थेट सवाल उपस्थित केला आहे. दुष्काळ सरसकट जाहीर झालाच आहे, मग केंद्रीय पथकाच्या पाहणीचा कोट्यावधीचा खेळ कशासाठी? या पाहणीचा खर्चच शेतकऱ्यांच्या कर्जमाफी एवढा आहे. सरकारने पाहण्याचे नाटक बंद करून शेतकऱ्याच्या खात्यात मदत जमा करावी, असे ते म्हणाले.

### बीड जिल्हा ओबीसी काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी गणेश जवकर यांची निवड



**बीड (प्रतिनिधी):-** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या बीड जिल्हा ओबीसी काँग्रेस कमिटीच्या जिल्हाध्यक्षपदी गणेश जवकर यांची निवड करण्यात आली. यानिमित्ताने काँग्रेस पक्षाच्या पदाधिकाऱ्यांसह उपस्थित मान्यवरांनी त्यांचा सत्कार करून अभिनंदन केले व पुढील सामाजिक आणि राजकीय वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी बीड शहर काँग्रेसचे अध्यक्ष तथा माजी नगरपरिषद सभापती इलयास टेलर, प्रा.हाजी रफिक बागवान, (माजी जिल्हाध्यक्ष तथा ऑल इंडिया मुस्लिम लीग ओबीसी महाराष्ट्र प्रदेशचे राज्य सचिव), काँग्रेसचे प्रदेश सचिव गणेश राऊत, काँग्रेस पक्षाच्या निराधार निराश्रितचे जिल्हाध्यक्ष मोहसीन शेख, जहीर शेख, काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते मिलिंद मस्के, मुस्लिम लीग ओबीसीचे शहराध्यक्ष मोमीन खुद्दूस खान आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

### मोगऱ्यात १५ वर्षापासून पायी ज्योतीची परंपरा

**माजलगाव (प्रतिनिधी):** श्रद्धा, भक्ती आणि परंपरेचा संगम साधत मोगरा येथील तरुणांनी तुळजापूरच्या आई जगदंबेचे दर्शन घेऊन पायी वारी करत ज्योत गावात आणली. गेल्या पंधरा वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा यंदाही उत्साहात जोपासण्यात आली. ज्योत घेऊन गावात दाखल झालेल्या तरुणांचे ग्रामस्थांनी जल्लोषात स्वागत केले. यामुळे गावात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे. मोगरा गावात आई जगदंबा देवीची स्थापना उत्साहात करण्यात आली. नऊ दिवसांच्या नवरात्रोत्सवात विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तुळजापूरला पायी जाऊन देवीचे दर्शन घेणे आणि तेथून ज्योत आणणे, या उपक्रमात गावातील तरुणांचा मोठ्या प्रमाणात सहभाग असतो. श्रद्धेने आणि उत्साहाने पार पडणाऱ्या या वारीमुळे गावातील धार्मिक परंपरेला उजाळा मिळत आहे. ज्योत घेऊन आलेल्या तरुणांचे स्वागत करण्यासाठी गावातील पुरुष मंडळी, महिला आणि भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी अतुल पांढरपोटे, दत्ता पांढरपोटे, परमेश्वर पांढरपोटे, सूर्यकांत सातपुते, तुकाराम भोजने, तुकाराम राठोड, प्रशांत पांढरपोटे, अभिषेक पांढरपोटे, बाळासाहेब भालेकर, विनायक भालेकर, वैजनाथ खाडे, अमर आलात, रवी भालेकर, कैलास बिजुले, बाळकृष्ण शिंदे, गोविंद इंगळे आणि गोरख इंगळे यांच्यासह ग्रामस्थ व महिला भाविक उपस्थित होते.

# शुद्ध व सात्विक अन्नाची आज समाजाला गरज- ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज मस्के

## ‘संताजी जगनाडे नैसर्गिक तेल घाण्याचे’ भव्य उद्घाटन



**बीड (प्रतिनिधी):-** आजच्या धावपळीच्या आणि भेसळीच्या युगात मानवी आरोग्य धोक्यात आले आहे. अशा काळात निरोगी आरोग्यासाठी प्रत्येकाने शुद्ध आणि सात्विक आहाराला प्राधान्य देणे गरजेचे आहे. घाण्याचे शुद्ध तेल हे आरोग्यासाठी अमृतसमान असून, या नैसर्गिक तेल घाण्याच्या माध्यमातून नागरिकांना उत्तम आरोग्य लाभेल, असा विश्वास महादेव मळी संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.गुरुवर्य पुरुषोत्तम महाराज मस्के यांनी व्यक्त केला.

बीड शहरातील राजीव गांधी चौक येथे नवीन सुरू करण्यात आलेल्या ‘संताजी जगनाडे नैसर्गिक तेल घाण्याचे’ भव्य उद्घाटन ह.भ.प. गुरुवर्य पुरुषोत्तम महाराज मस्के यांच्या शुभहस्ते सोमवार दि.१२ ऑक्टोबर २०२६ रोजी संपन्न झाले. या प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलतांना ह.भ.प.पुरुषोत्तम महाराज म्हणाले की, घाण्याचे शुद्ध तेल आरोग्यासाठी अमृतसमान मानले जाते, कारण ते कोणत्याही केमिकल किंवा अति उष्णतेशिवाय नैसर्गिक पद्धतीने काढले जाते. आजकाल बाजारात मिळणार्या रिफाइंड तेलाच्या तुलनेत घाण्याचे तेल शरीराला निरोगी ठेवण्यासाठी अत्यंत फायदेशीर ठरु शकते असेही ते म्हणाले.

या उद्घाटन सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून श्रेणीक खिंवसरा, धनंजय कुलकर्णी, दत्तात्रय कवचट सर, ॲड. गोपाळ म्हात्रे, यादव सर, श्रीकृष्ण जोशी सर, यांच्यासह या उद्घाटन सोहळ्याला परिसरातील अनेक मान्यवर, राजकीय, सामाजिक व व्यावसायिक क्षेत्रातील प्रतिष्ठित व्यक्ती तसेच मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

### ग्राहकांना मिळणार शुद्धतेची हमी

**या नैसर्गिक तेल घाण्यामध्ये शेंगदाणा, करडई, सूर्यफूल, मोहरी, आणि तीळ यांपासून पूर्णपणे नैसर्गिक व थंड पद्धतीने तेल काढले जाणार आहे. यामध्ये कोणत्याही रासायनिक प्रक्रियेचा किंवा भेसळीचा वापर न करता, ग्राहकांना थेट डोळ्यांदेखत शुद्ध तेल उपलब्ध करून दिले जाईल, अशी माहिती संचालक शंकर धोंडीराम लांडे यांनी दिली. या नवीन व्यवसायाबद्दल उपस्थित मान्यवरांनी आणि नागरिकांनी संचालकांचे कौतुक केले.**

### दिव्यांगात्वावर मात; आर्यनच्या जिद्दीला सीईओंची शाबासकी!

**लेखकाची मदत न घेता स्वतः सोडविली इस्त्रो–नासा सहलीची परीक्षा**

**बीड (प्रतिनिधी):-** शारीरिक आव्हानांवर मात करण्यासाठी जिद्द, आत्मविश्वास आणि ध्येयाप्रती निष्ठा असेल, तर कोणतीही अडचण आड येऊ शकत नाही, याचा प्रत्यय तालुक्यातील दगडी शहाजानपूर येथील आर्यन प्रकाश धुताडमल या विद्यार्थ्याने दिला. सेरेब्रल पाल्सी या आजाराशी सामना करणाऱ्या आर्यनने जिल्हा परिषदेकडून आयोजित इस्त्रो आणि नासा सहलीसाठीची केंद्रस्तरीय निवड चाचणीत सहभागी होत स्वतःच्या हाताने पेपर सोडविला. त्याच्या या जिद्दीचे बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी कौतुक केले. आर्यनचा सत्कार करून त्याला शुभेच्छाही दिल्या. आर्यन हा दगडी शहाजानपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता सहावीत शिकतो. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांच्या संकल्पनेतून आणि प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली 'इस्त्रो–नासा शैक्षणिक सहल' हा नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत घेण्यात आलेल्या केंद्रस्तरीय निवड चाचणीत आर्यनने उत्साहाने सहभाग नोंदविला. विशेष गरजाधारक विद्यार्थ्यांना नियमानुसार लेखक किंवा वाचकाची मदत घेण्याची सवलत असते. मात्र, आर्यनने कोणत्याही लेखकाची किंवा वाचकाची मदत न घेता स्वतःच्या हाताने प्रश्नपत्रिका सोडविली. त्याच्या कृतीतून अभ्यासाप्रती असलेली निष्ठा आणि स्वतःच्या क्षमतेवरील विश्वास दिसून आत्मविश्वासाची आणि जिद्दीची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी त्याचे विशेष कौतुक केले. त्याचा सत्कार करून पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



# गुरुगिरी शिवाचार्य मानूरकर महाराजांचा पुण्यस्मरण सोहळा

### समाधीस्थळी रुद्राभिषेक, महाआरतीसह महाप्रसाद; गुरुपरंपरेप्रती भाविकांची श्रद्धा

**शिरुर (प्रतिनिधी):-** तालुक्यातील मानूर येथील श्री तीर्थक्षेत्र नागनाथ देवस्थान जहागिरदार मठ संस्थानमध्ये गुरुगिरी शिवाचार्य मानूरकर महाराज यांचा पंधरावा पुण्यस्मरण सोहळा शनिवारी (दि.१०) धार्मिक विधी आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. मानूर येथील प्रसिद्ध जहागिरदार मठ संस्थानचे मठाधिपती गुरुवर्य विरुपाक्ष शिवाचार्य महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा पार पडला. यानिमित्त सद्गुरू नागनाथ महाराज आणि लिंगैक्य गुरुगिरी शिवाचार्य मानूरकर महाराज यांच्या समाधीस्थळी विधिवत रुद्राभिषेक करण्यात आला.

भाविकांनी समाधीस्थळी दर्शन घेऊन महाराजांच्या स्मृतींना अभिवादन केले. पहाटेपासूनच मठ संस्थान परिसरात धार्मिक विधींची लगबग सुरू होती. वेदमंत्रांचा घोष, शिवनामाचा गजर आणि भक्तांच्या उपस्थितीमुळे परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. सोहळ्यानिमित्त सकाळी सहा ते नऊ या वेळेत सद्गुरू नागनाथ महाराज यांच्या समाधीस्थळी रुद्राभिषेक करण्यात आला. त्यानंतर सकाळी नऊ ते दुपारी बारापर्यंत शिवाचार्य मानूरकर महाराज यांच्या समाधीस्थळी उपस्थित स्वामींच्या मंत्रघोषात रुद्राभिषेकाचा धार्मिक विधी पार पडला. विधिवत पूजा–अर्चा आणि मंत्रोच्चारांत भाविकांनी सहभाग घेतला. दुपारी बारा वाजता महाआरती करण्यात आली. त्यानंतर उपस्थित शिष्य, भक्त आणि ग्रामस्थांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. करंजी (ता. आष्टी) येथील समस्त मुळे परिवार आणि शिष्यगण महाप्रसादाचे यजमान होते. महाप्रसादानंतर कळंब येथील महिला भजनी मंडळ आणि वाणेवाडी (ता. तेर) येथील भजनी मंडळाच्या वतीने सामूहिक भजनाचा कार्यक्रम



आयोजित करण्यात आला होता. भक्तिगीतांच्या सादरीकरणातून गुरुभक्तीचा जागर करण्यात आला. भजन आणि नामस्मरणामुळे मठ संस्थान परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला होता.

# नवरात्रीतही एक मंडळ,एक पोलीस उपक्रम

**बीड (प्रतिनिधी):-** शारदीय नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्यात भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. यावर्षी जिल्ह्यातील सुमारे २५० सार्वजनिक दुर्गा उत्सव मंडळांकडून श्री दुगदिवीच्या मूर्तीची स्थापना करण्यात येणार आहे. गेल्या वर्षी जिल्ह्यात २३० मंडळांनी दुर्गामूर्तीची स्थापना केली होती. यंदा त्यात वाढ झाली असून सुमारे २३० ते २५० मंडळे उत्सवासाठी सज्ज झाली आहेत. गणेशोत्सवाप्रमाणेच नवरात्रीतही ‘एक मंडळ, एक पोलिस कर्मचारी’ उपक्रम राबवला जात आहे.

जिल्ह्यात दुष्काळी स्थिती असली तरी परंपरेप्रमाणे नवरात्रोत्सव साजरा करण्याची तयारी सार्वजनिक मंडळांकडून करण्यात आली आहे. बीडची खंडेश्वरी, अंबाजोगाईची योगेश्वरी, तलवाडा येथील त्वरितादेवी, शिरूर कासार येथील कालिकादेवी, धारूरची अंबाचौंडी, गेवराईची रेणुका माता या मंदिरांमध्ये मोठा उत्साह असतो. यासोबतच सार्वजनिक मंडळाकडूनही दुर्गा स्थापना करून विविध उपक्रम राबवले जातात. पोलिस अधीक्षक कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, गतवर्षी २३० मंडळांनी सार्वजनिक दुर्गा स्थापना केली होती. यंदाही जिल्ह्यात २३० ते २५० मंडळे असणार आहेत. नवरात्रोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पाडण्यासाठी पोलिस प्रशासन व स्थानिक प्रशासनाकडून प्रयत्न केले जात आहेत. मंडळांना ऑनलाइन पद्धतीने पोलिसांकडून परवाना दिला जात आहे. सर्व सार्वजनिक मंडळांनी शासकीय नियमांचे व कायद्याचे तंतोतंत पालन करून उत्सव साजरा करावा, असे आवाहन पोलिस दलाकडून करण्यात आले आहे. नवरात्रीत एक मंडळ, एक पोलिस कर्मचारी असा उपक्रम राबवला जाणार आहे. स्थानिक पोलिसांचा बंदोबस्त असेलच, मात्र अतिरिक्त बंदोबस्तासाठी जिल्ह्याला राज्य राखीव पोलिस बलाची एक प्लाटून, ५०० पुरुष होमगार्ड, १०० महिला होमगार्ड जिल्ह्याला मिळाले आहेत. दरम्यान, नवरात्रोत्सवात महिला भाविक मोठ्या प्रमाणावर देवीच्या दर्शनासाठी जातात. दांडिया, गरबासारखे कार्यक्रमही होतात. त्यामुळे महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही पोलिस दलाकडून सूचना देण्यात आल्या आहेत. स्थानिक पोलिसांसह दामिनी पथकाची टवाळखोरांवर नजर असणार आहे. गेवराई। मागील वर्षाच्या तुलनेत पीओपी आणि रंगांच्या किमतीत वाढ झाल्याने यंदा दुर्गामूर्तीच्या किमतीत २० टक्क्यांनी वाढ झाली आहे. गेवराई शहरातून गेवराई तालुक्यासह जालना जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील विविध गावांमध्ये दुर्गा देवीच्या मूर्ती खरेदी केल्या जातात. पीओपी आणि रंगांच्या दरात वाढ झाल्यामुळे मूर्तींच्या किमतीही वाढल्याची माहिती मूर्ती विक्रेते शंकर राऊत यांनी दिली.

# गॅलक्सी पॉलिक्लिनिकच्या मोफत आरोग्य तपासणी शिबीराला उत्स्फूर्त प्रतिसाद

## डॉ. सय्यद सोहेल यांच्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक

**बीड (प्रतिनिधी)-** सर्वसामान्यांचे आरोग्य निरोगी राहावे आणि वेळेवर योग्य उपचार मिळावेत या सामाजिक उद्देशातून बालेपीर भागातील नगर रोडवर गॅलक्सी पॉलिक्लिनिक पोलीस पेट्रोल पंपासमोर, एफ.एम. जिम खाली येथे दिनांक ११ ऑक्टोबर रविवार रोजी आयोजित मोफत सामान्य आरोग्य तपासणी व आरोग्य शिबिराला रुग्णांचा व नागरिकांचा उत्स्फूर्त आणि उदंड प्रतिसाद मिळाला.

या शिबिरामध्ये डॉ. सय्यद सोहेल एम.डी. फिजीशियन यांनी उपस्थित शेकडो रुग्णांची आस्थेने व सखोल तपासणी करून त्यांना योग्य वैद्यकीय मार्गदर्शन करत तपासणी केली. या शिबीरात रुग्णांची सामान्य आरोग्य तपासणी, उच्च रक्तदाब आणि रँडम ब्लड शुगर चाचणी करण्यात आली. याशिवाय आवश्यकतेनुसार रुग्णांची ई.सी.जी. चाचणी, लिपिड प्रोफाईल टेस्ट (रक्तातील चरबीचे प्रमाण) व किडनी/लिव्हरची तपासणी पूर्णपणे मोफत करण्यात आली. तसेच सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी, अशक्तपणा यावरील टॉनिक व इतर सर्व आवश्यक औषधींचे रुग्णांना मोफत वाटप करण्यात आले. तुमचे आरोग्य आमची पहिली प्राथमिकता हे ब्रीद समोर ठेवून आयोजित करण्यात आलेल्या या शिबीरामुळे परिसरातील शेकडो सर्वसामान्य व गरजू नागरिकांना मोठा दिलासा मिळाला. नागरिकांनी डॉ. सय्यद सोहेल आणि गॅलक्सी पॉलिक्लिनिकच्या टीमचे मनःपूर्वक आभार मानले.



## आ.धनंजय मुंडे यांच्या चांगल्या कारभाराला न.प.तील घरकुल विभागातील कर्मचाऱ्यांकडून कलंक लावण्याचा प्रयत्न

# अपंग व्यक्तीला घरकुल मंजुर असतानाही न दिल्याने आली आत्मदहन करण्याची वेळ

### जिल्हाधिकारी साहेब उघडा डोळे बघा नीट वर प्रश्नचिन्ह





परळी वैजनाथ (सरकार): प्रधानमंत्री घरकुल योजनेच्या पात्रता यादीत नाव समाविष्ट असूनही गेल्या दहा महिन्यांपासून घरकुलाचा लाभ मिळत नसल्याचा आरोप करत परळीतील दिव्यांग विशाल ज्ञानोबा पंडित यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. वारंवार पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने त्यांनी येत्या १५ ऑक्टोबर २०२६ रोजी नगर परिषद कार्यालयात आत्मदहन करण्याचा इशारा दिला आहे. यासंदर्भात त्यांनी प्रशासनाला निवेदनही सादर केल्याचे सांगितले आहे.

परळी वैजनाथ येथील भिमनगर, जगतकर गल्ली परिसरात राहणारे विशाल पंडित यांनी प्रधानमंत्री घरकुल योजनेसाठी रीतसर अर्ज दाखल केला आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, संबंधित पात्रता यादीत त्यांचे नाव समाविष्ट आहे. मात्र, गेल्या दहा महिन्यांपासून नगर परिषदेतील संबंधित अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकडे सातत्याने पाठपुरावा करूनही त्यांना घरकुलाचा लाभ मिळालेला नाही.

दिव्यांग असलेल्या विशाल पंडित यांना घरकुलासाठी वारंवार कार्यालयाचे उंबरठे झिजवावे लागत असल्याचा मुद्दा उपस्थित होत आहे. पात्रता यादीत नाव असूनही लाभ मिळत नसेल, तर नेमकी अडचण काय आहे? संबंधित प्रकरण प्रलंबित राहण्यामागचे कारण काय? असे प्रश्न आता उपस्थित केले जात आहेत.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र नागरिकांपर्यंत वेळेत पोहोचवणे ही प्रशासनाची जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत दिव्यांग लाभार्थ्याला दहा महिन्यांपासून घरकुलासाठी प्रतीक्षा करावी लागत असल्याचा आरोप गंभीर आहे. विशाल पंडित यांच्या अर्जाची सद्यस्थिती काय आहे, लाभ मंजूर होण्यात कोणत्या अडचणी आहेत आणि त्यावर आतापर्यंत काय कार्यवाही झाली, याची स्पष्ट माहिती नगर परिषद प्रशासनाने देणे आवश्यक आहे.

विशाल पंडित यांनी नगर परिषद परळी वैजनाथच्या मुख्याधिकाऱ्यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालावे, संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक सूचना द्याव्यात आणि नियमानुसार पात्र असल्यास घरकुल योजनेचा लाभ लवकरात लवकर उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली आहे.

दरम्यान, १५ ऑक्टोबर रोजी आत्मदहनाचा इशारा दिल्यामुळे या प्रकरणाचे गांभीर्य वाढले आहे. कोणत्याही नागरिकावर टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ येऊ नये, यासाठी प्रशासनाने वेळेत दखल घेऊन संवाद साधणे आणि सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक पावले उचलणे गरजेचे आहे.

दिव्यांग विशाल पंडित यांच्या तक्रारीवर नगर परिषद प्रशासन काय निर्णय घेणार, त्यांच्या अर्जातील अडचणी दूर होणार का आणि त्यांना घरकुल योजनेचा लाभ कधी मिळणार, याकडे परळीकरांचे लक्ष लागले आहे. प्रशासनाने या प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करून नियमानुसार तातडीने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## वडिलांचा खून केल्याच्या आरोपातून मुलाची निर्दोष मुक्तता



बीड (सरकार): मौजे महिंदा ता. आष्टी जि. बीड येथील मयत दत्तू सुखदेव आव्हाड यांचा खून केल्याच्या आरोपातून मयताचा मुलगा संतोष दत्तू आव्हाड याची आज प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, बीड यांनी सबळ पुराव्या अभावी निर्दोष मुक्तता केली आहे.

या प्रकरणाबाबत थोडक्यात हकीकत अशी की ,अंमळनेर पोलीस ठाण्यात गु.र.नं .५३/२५ नुसार कलम १०३(१) भारतीय न्याय संहिता अन्वये फिर्यादी बळीराम गीते यांनी आरोपी संतोष दत्तू आव्हाड याचे विरुद्ध त्याने त्याच्या वडिलांचा खून केल्याचा आरोप करून सदरचा गुन्हा नोंद केला होता, त्यानुसार आरोपीस अंमळनेर पोलिसांनी अटक करून पुरेशी पोलीस कस्टडी मिळवली व त्यानंतर आरोपीस मा .न्यायालयाने न्यायालयीन कोठडीत पाठवले, दरम्यानच्या काळात तपास चालू असताना तसेच तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपीतर्फे तीन वेळा त्याचा जामीन अर्ज सत्र न्यायालयात दाखल केला होता मात्र न्यायालयाने आरोपी संतोष यास जामीनावर सोडण्यास नकार दिला, व सदरचा खटला आरोपीस जिल्हा कारागृहात ठेवूनच चालवावा असा आदेश केला, त्या अनुषंगाने सदरचा खुनाचा खटला मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायालय, बीड येथे चालविण्यात आला, या खटल्यामध्ये सरकार पक्षातर्फे एकूण १३ साक्षीदार तपासण्यात आले, त्यामध्ये मयताचा जावई बळीराम गीते यास फिर्यादी म्हणून तपासले तसेच मयताची पत्नी व मयताच्या चार मुली, मयताचा पुतण्या आणि घटनास्थळ पंच व हत्यार जप्ती पंचनाम्यावरील पंच तपासण्यात आले, त्याचबरोबर सीसीटीव्ही फुटेज मधील तज्ञ व एक धाबा चालक व एक स्वतंत्र साक्षीदार आणि वैद्यकीय अधिकारी आणि दोन पोलीसतपासी अंमलदारांसह एकूण १३ जणांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या, मात्र तपासातील त्रुटी तसेच रासायनिक विश्लेषणाचे अहवाल आणि साक्षीदारांच्या

जाबजबाबात मतभिन्नता दिसून आल्याने व आरोपीतर्फे बीड येथील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. अनिल बारगजे यांचा उलटतपास व युक्तिवाद तसेच दाखले याचे जोरावर व अंतिम युक्तीवादानंतर मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साहेब, बीड यांनी आज सबळ पुराव्या अभावी आरोपी संतोष दत्तू आव्हाड याची निर्दोष मुक्तता केली. या खटल्याकडे महिंदा ता. आष्टी जि. बीड सह आजूबाजूच्या गावातील नागरिकांचे लक्ष लागून राहिले होते, या खटल्यामध्ये आरोपी संतोष च्या वतीने बीड येथील ज्येष्ठ वकील अनिल बारगजे, किशोर खेडकर यांनी प्रभावी काम केले, व आरोपीची निर्दोष मुक्तता करणे कामी मोठी कामगिरी निभावली, त्यांना ॲड. विलास ढाकणे, सुनील आंधळे, दत्ता शिंदे आदी वकिलांनी सहकार्य केले, या निकालामुळे ॲड. बारगजे व किशोर खेडकर यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## परळी कृषी विभागाकडून ८५ ‘आरोग्यदायी रानभाज्यांची ओळख’माहिती पुस्तिका प्रकाशित

बीड (सरकार): रानभाजी महोत्सवाचे औचित्य साधून तालुका कृषी अधिकारी कार्यालय, परळी वैजनाथ यांच्या वतीने 'आरोग्यदायी रानभाज्यांची ओळख' ही अत्यंत महत्त्वपूर्ण आणि माहितीपूर्ण पुस्तिका तयार करण्यात आली आहे. तालुका कृषी अधिकारी डॉ. अर्चना पद्मिनी शंकरराव नागरगोजे यांच्या संकल्पनेतून आणि संपादनाखाली ही पुस्तिका प्रकाशित करण्यात आली असून, याद्वारे निसर्गाच्या कुशीत दडलेला रानमेवा जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला आहे.

बदलत्या आणि वेगवान जीवनशैलीमुळे आपण नैसर्गिक आणि पौष्टिक आहारापासून दुरावत चाललो आहोत, या पार्श्वभूमीवर ही पुस्तिका सर्वांसाठी एक उत्तम मार्गदर्शक ठरणार आहे. या पुस्तिकेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध भागात आढळणाऱ्या एकूण ८५ रानभाज्यांची सविस्तर माहिती संकलित करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने पालेभाज्या, कंदमुळे, पाण्यातील वनस्पती, वेलवर्गीय भाज्या, झुडपे, वृक्ष आणि बुरशीजन्य भाज्यांचा समावेश आहे. या प्रत्येक रानभाजीचा आढळ कुठे होतो, तिचे आरोग्याच्या दृष्टीने आहारातील महत्त्व काय आहे, तिचे औषधी गुणधर्म कोणते आहेत आणि ती चविष्ट पद्धतीने शिजवण्याची पाककला काय आहे, याची इत्थंभूत माहिती या पुस्तिकेत देण्यात आली आहे.

सध्याच्या काळात भाजीपाल्याच्या उत्पादनात रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा अतिवापर होत असल्याने आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. मात्र, रानभाज्या या रानावनात पूर्णपणे नैसर्गिकरीत्या येत असल्याने त्या विषमुक्त, सेंद्रिय आणि औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण असतात. ग्रामीण भागातील शेतकरी तसेच शहरी भागातील नागरिकांनी या रासायनिक फवारणीमुक्त रानभाज्यांची अचूक ओळख पटवून त्यांचा आपल्या रोजच्या आहारात आवर्जून समावेश करावा, या मुख्य उद्देशाने या पीडीएफ पुस्तिकेची निर्मिती करण्यात आली आहे. यामुळे शहरी ग्राहकांना उत्तम व पौष्टिक आहार मिळेल, तर दुसरीकडे रानावनातून या भाज्या गोळा करून बाजारात विकणाऱ्या ग्रामीण आणि आदिवासी कष्टकरी बांधवांना रोजगाराची व उत्पन्नाची नवी संधी उपलब्ध होऊन मोठा आर्थिक हातभार लागेल.

परळी कृषी विभागाच्या या अभिनव आणि काळाची गरज असलेल्या उपक्रमाचे सर्वच स्तरातून भरभरून कौतुक होत आहे. राज्याच्या मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे, बीडचे खासदार बजरंग मनोहर सोनवणे, परळीचे आमदार धनंजय मुंडे आणि बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या पुस्तिकेच्या निर्मितीबद्दल तालुका कृषी अधिकारी व त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष अभिनंदन केले असून उपक्रमास लेखी शुभेच्छा दिल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांनी, शेतकरी बांधवांनी आणि विशेषतः तरुण पिढीने या पीडीएफ पुस्तिकेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन आपल्या व आपल्या कुटुंबाच्या सुदृढ आरोग्यासाठी रानभाज्यांचा आहारात नियमित वापर करावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

## तळागाळातील विद्यार्थ्यांना घडवा ;गुणवत्तेच्या बळावर जागतिक स्तरावर चमकण्याची संधी निर्माण करा–जयदत्त क्षीरसागर



शिरूर कासार (सरकार): शिक्षणाच्या माध्यमातून तळागाळातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. आजच्या स्पर्धात्मक युगात गुणवत्तेला जागतिक स्तरावर अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देऊन चालणार नाही, तर संशोधन, सांस्कृतिक क्षेत्र आणि क्रीडा क्षेत्रातही त्यांना प्राविण्य मिळविण्यासाठी सक्षम करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

शिरूर कासार येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माजी खा.स्व.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या स्मृतिदालनाचे उद्घाटन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी सभापती सतीश काटे, सुधाकर मिसाळ, बाबुराव केदार, सुभाष क्षीरसागर, शरद ढाकणे, गहिनीनाथ पाखरे, सुलेमान पठाण, गोविंद पाटील गाडेकर, कलंदर पठाण, आजिनाथ गवळी यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना क्षीरसागर म्हणाले की, आपल्या काळात शैक्षणिक वातावरण आजच्या तुलनेत फारसे प्रभावी आणि परिणामकारक नव्हते. मात्र, अलीकडच्या काळात शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड वेगाने बदल होत आहेत. या बदलत्या परिस्थितीत विद्यार्थ्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवून ज्ञान, कौशल्य आणि गुणवत्तेच्या बळावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली पाहिजे. संधी निर्माण करण्याची ताकद गुणवत्तेत असते. केवळ इतरांच्या आधारावर प्रगती करता येत नाही; स्वतःच्या क्षमतेवर उभे राहण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाली पाहिजे. शासनाने निर्माण केलेल्या विकासाच्या संधी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), रोबोटिक्स आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे शिक्षण क्षेत्रासमोर नवी आव्हाने निर्माण झाली आहेत. या बदलांकडे केवळ आव्हान म्हणून न पाहता त्यांचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांची ज्ञानक्षमता आणि संशोधनवृत्ती विकसित केली पाहिजे. देशाच्या प्रगतीत पारंपरिक १०+२+३+२ शैक्षणिक रचनेचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे. त्याचबरोबर नवीन शैक्षणिक धोरणातून होत असलेले बदलही भावी पिढीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतात. या परिवर्तनातून देशाच्या शैक्षणिक भविष्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी सांस्कृतिक विभाग तसेच आविष्कार' संशोधन उपक्रमांतर्गत विविध स्तरांवर प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.विश्वास कंधारे, मुख्याध्यापक केशव भांगे, सर्व प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## भीषण दुष्काळामुळे घरपट्टी,पाणीपट्टी पूर्णतः माफ करा!

### जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील यांची नगरपालिकेकडे मागणी; नियमित पाणीपुरवठा करण्याचाही इशारा



बीड (सरकार) बीड जिल्ह्यात सर्वत्र भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली असून सर्वसामान्यांचे जनजीवन पार विस्कळीत झाले आहे. या गंभीर संकटाची दखल घेत बीड नगरपालिकेने शहरातील नागरिकांची घरपट्टी आणि पाणीपट्टी (नळपट्टी) पूर्णतः माफ करावी, अशी ठाम मागणी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांना प्रसिद्धी पत्रकाद्वारे प्रशासनाचे लक्ष वेधले आहे.

''विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ, मग घरपट्टी–पाणीपट्टी का नाही?'':

राज्य सरकारने दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून विद्यार्थ्यांची परीक्षा फी माफ करून मोठा दिलासा दिला आहे. याच धर्तीवर स्थानिक पातळीवर बीड नगरपालिकेने औदार्य दाखवणे गरजेचे आहे, असे सांगत उल्हास गिराम पाटील यांनी प्रशासनाला सवाल केला. ''नागरिकांची कर भरण्याची आर्थिक क्षमता उरलेली नसताना नगरपालिकेने करवसुलीचा तगादा न लावता घरपट्टी व पाणीपट्टी पूर्णपणे माफ करून बीडकरांना दिलासा दिला पाहिजे,'' असा खणखणीत युक्तिवाद त्यांनी मांडला. शहरवासीयांना भेडसावणाऱ्या पिण्याच्या पाण्याच्या प्रश्नावर बोट ठेवताना गिराम पाटील म्हणाले की, ''दुष्काळामुळे जनता आधीच होरपळून निघत आहे, त्यातच नगरपालिकेकडून शहरात वेळेवर आणि नियमित पाणीपुरवठा केला जात नाही. नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. ही अत्यंत खेदजनक बाब असून नगरपालिकेने तात्काळ उपाययोजना करून शहरात सुरळीत व नियमित पाणी पुरवठा सुरू करावा.'' करमाफी: जिल्ह्यातील भीषण दुष्काळ लक्षात घेता बीड नगरपालिकेने चालू आर्थिक वर्षाची घरपट्टी व नळपट्टी (पाणीपट्टी) तात्काळ माफ करावी. सुरळीत पाणीपुरवठा: शहरात कृत्रिम पाणीटंचाई दूर करून नागरिकांना वेळेवर व नियमित पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्यावे. शासकीय धोरणाची अमलबजावणी: राज्य सरकारच्या दुष्काळ निवारण धोरणाच्या धर्तीवर स्थानिक पातळीवर नागरिकांना आर्थिक सवलती द्याव्यात. ''दुष्काळाच्या या कठीण काळात प्रशासनाने संवेदनशील राहून नागरिकांना तात्काळ करमाफी आणि नियमित पाणीपुरवठ्याचा दिलासा दिला नाही, तर शिवसेना (उबाठा) पक्षाच्या वतीने बीडकरांच्या हक्कासाठी रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन उभारले जाईल,'' असा इशारा उल्हास गिराम पाटील यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिला आहे.

## पिक कर्जासाठी लिंबागणेश येथे गुरुवारी रास्तारोको!



बीड (सरकार) विभागीय कार्यालयाच्या आदेशानुसार वैयक्तिक कर्जाची थकबाकी तसेच जामीनदार म्हणून असलेल्या थकीत देयकांचे कारण पुढे करून महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या लिंबागणेश शाखेकडून शेतकऱ्यांचे पिक कर्जाचे प्रस्ताव स्वीकारले जात नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. या अटींमुळे शेतकऱ्यांची आर्थिक, शारीरिक व मानसिक पिळवणूक होत असल्याचा दावा करत संबंधित अटींमध्ये शिथिलता आणावी आणि पिक कर्ज वाटपाची प्रक्रिया जलदगतीने राबवावी, या मागणीसाठी गुरुवार, दि. १५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज चौक, लिंबागणेश येथे रास्तारोको आंदोलन करण्यात येणार आहे.

सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात येणार असून, यासंदर्भातील निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्राताई पवार, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे आणि कृषिमंत्री दत्तामामा भरणे यांना जिल्हाधिकाऱ्यांमार्फत पाठविण्यात आले आहे. राज्य सरकारकडून दुष्काळी परिस्थितीत बँकांनी शेतकऱ्यांची अडवणूक करू नये, अशी भूमिका मांडली जात असताना महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या बीड विभागीय कार्यालयाच्या धोरणामुळे शेतकऱ्यांना पिक कर्ज मिळण्यात अडचणी येत असल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. या प्रकारामुळे परिसरातील शेतकऱ्यांमध्ये नाराजी पसरली असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सध्या शेतकरी दुष्काळी परिस्थिती आणि आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. अशा परिस्थितीत केवळ जामीनदार असल्यामुळे किंवा संबंधित कर्जाच्या थकबाकीमुळे शेतकऱ्यांना नव्याने पिक कर्ज नाकारले जात असेल, तर या धोरणाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. बँकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या प्रकरणात तातडीने लक्ष घालून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणीही करण्यात आली आहे. या निवेदनावर सरपंच बालासाहेब जाधव, बाळकृष्ण थोरात, दादा गायकवाड, संतोष भोसले, महावीर जाधव, सय्यद अख्तर, उमेश वाणी, रामकिसन गिरे, रामदास वाणी, भालचंद्र गिरे, प्रकाश वायभट, महादेव आवटे, अभिमान वाणी, विक्रांत वाणी, अँड .गणेश वाणी, आशोकराजे वाणी, पांडुरंग वाणी, शिवाजी शिंदे, जय जाधव आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड–४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड–४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही– वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)